महाराष्ट्र शासन

क्रमांक : व्हीएलएस १०००/(५०९/२०००)/(१)/प्राशि -३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ६ सप्टेंबर, २०००.

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे/नाशिक/कोल्हापूर/अमरावती/
नागपूर/औरंगाबाद

**विषय : सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देणेबाबबत**

सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षी परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील ५५ शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास जून २००० पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे. परवानगी देण्याविषयीचा शासनाचा निर्णय संबंधित संस्थांना तात्काळ कळविण्यात यावा.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : व्हीएलएस १०००/(५०९/२०००)/(१)/प्राशि-३ दिनांक २१ जुलै, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र दिनांक २१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

(सही)
( वि.व.चिंदरकर )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित
१) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
३) प्रशासन अधिकारी, नगरपालिका/महानगरपालिका शिक्षण मंडळ,
४) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी अग्रेषित
५) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी अग्रेषित
६) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक

निवड नस्ती, प्राशि-३

HEADMISTRESS
(Primary Section)

( सन २०००-२००१ या वर्षी (जून २००० पासून) इंग्रजी माध्यमाच्या ५५ नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनपत्र क्रमांक खीएलास १०००/(५०९/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक ५ सप्टेंबर, २००० चे सहपत्र )

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण |
|---|---|---|
| | जिल्हा - पुणे | |
| १. | पुणे विद्यार्थी गृह, पुणे | नेरुळ, नवी मुंबई, जि. ठाणे |
| २. | विश्व कल्याण एज्युकेशन सोसायटी, तळेगांव, दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे | तळेगांव, दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे |
| ३. | महावीर एज्युकेशन सोसायटी, कामशेत, ता. मावळ, जि. पुणे | कामशेत, ता. मावळ, जि. पुणे |
| ४. | सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, पुणे | वडगांव बु., जि. पुणे |
| ५. | पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड, पुणे | पिंपरी चिंचवड, जि. पुणे |
| ६. | अभिनव एज्युकेशन सोसायटी, पुणे | सातारा रोड, धनकवडी, जि. पुणे |
| ७. | चैतन्य एज्युकेशन ट्रस्ट, सदाशिव पेठ, पुणे | मॉडेल कॉलनी, जि. पुणे |
| ८. | प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे | वारजे, जि. पुणे |
| ९. | त्रिमूर्ती शिक्षण संस्था, वाघोली, पुणे | वाघेश्वर, ता. हवेली, जि. पुणे |
| १०. | उत्कर्ष शिक्षण, कला व क्रीडा मंडळ, वडगांव बु., पुणे | पुणे, जि. पुणे |
| ११. | सोमेश्वर फाऊंडेशन, पुणे | पाषाण, जि. पुणे |
| | जिल्हा - सोलापूर | |
| १२. | हिंदुस्थानी कॉन्व्हेंट चर्च, सोलापूर | १६६, रेल्वे लाईन, सोलापूर, जि. सोलापूर |
| | जिल्हा - नाशिक | |
| १३. | नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक | मु. पो. देवळाली कॅम्प, ता. जि. नाशिक |
| १४. | नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक | मु. पो. वडनेर भैरव, ता. चांदवड, जि. नाशिक |
| १५. | नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक | मु. पो. मालेगांव, सोयगांव नाका, जि. नाशिक |
| १६. | कस्पा परिसर विकास मंडळ, विठेवाडी, ता. देवळाली, जि. नाशिक | विठेवाडी, ता. देवळाली, जि. नाशिक |
| १७. | भाऊसाहेब हिरे स्मरणिका ट्रस्ट, मालेगांव कॅम्प, जि. नाशिक | मालेगांव कॅम्प, जि. नाशिक |
| १८ | जय गुरुदेव एज्युकेशनल अँन्ड वेल्फेअर ट्रस्ट, नाशिक | नाशिक रोड, जि. नाशिक |

निवाचे